प्रजावाणी - बुधवार, दि. ३० मार्च २०२२

# डॉलरचे आमिष दाखवून लोकांना लूटणाऱ्या टोळीला केले जेरबंद

## एलसीबीने तिघांना केली अटक

नांदेड, दि. २९ : काही दिवसांपूर्वी 'एलसीबी'ने ५० लाखाची बॅग पळविणाऱ्या 'साऊथ गँग'च्या मुसक्या आवळल्यानंतर लोकांना डॉलरचे अमिष दाखवून त्या बदल्यात भारतीय चलन घेवून गंडा घालण्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीला 'एलसीबी'ने पकडले. ही सुद्धा 'साऊथ गँग' असून त्यांच्याकडून एक इरटिगा कार, चाकू तसेच भारतीय चलनातील ७५० कोटी रूपयांची किंमत असलेली एक बिलीयन डॉलरची नोट पोलिसांनी जप्त केली. या प्रकरणी पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस स्थानकात आरोपीविरूद्ध विविध कलमान्वयेगुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून जप्त केलेल्या एका बिलीयन डॉलरची किंमत भारतीय चलनानुसार ७५० कोटी असलयाचे सांगितले जाते ती डॉलरची नोटच खोटी असल्याची कबुली आरोपींनी दिली आहे. सुरुवातीला सदर नोट खरी की खोटी असाही प्रश्न पोलिसांना पडला होता. 'एलसीबी'च्या पथकाने तीघाजणांना अटक केली असून दोघेजण फरार असल्याचे सांगण्यात आले.

रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या शोधात 'एलसीबी'चे पथक गस्त घालत होते. त्यावेळी बडपुराच्या बाजूला गेट नं. एकच्या परिसरात इरटीगा (टीएस-१७-२०४५) गाडी उभी असून काही संशयित व्यक्ती लोकांना बोलावून त्यांच्याकडे एक बिलीयन डॉलरची नोट दाखवून, डॉलर घ्या आणि त्याबदल्यात ५० लाख द्या. त्या एका डॉलरची किमत ६५० कोटी असून बाकीचे पैसे तुम्ही घ्या सांगत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून तिघाजणांना ताब्यात घेतले तर दोघे जण फरार झाले. पोलिसांनी झाडाझडती घेतली असता ती डॉलरची नोट नकली असून ती लोकांना खरी म्हणून दाखवण्याची समोरची व्यक्ती पैसे घेवून आली की चाकूचा धाक दाखवून पैसे घेवून पळून जायचे असा प्लान करत असल्याची माहिती आरोपींनी पोलिसांना दिली.

पोलिसांनी महेश इलप्पा वेललुटला (३०, सर्वापूर ता. गांधारी, जि. कामारेड्डी), नंदकिशोर गालरेड्डी देवारम (४२, पोचम्मा गल्ली, बान्सवाडा),



आनंदराव अयात्रा गुंजी (३२ बान्सवाडा) या तीन आरोपींना अटक केली. असून सुमारे साडे अकरा लाख रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक प्रमोद शेवाळे, अति.पो. अधीक्षक निलेश मोरे, अति.पो. अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली व 'एलसीबी'चे प्रमुख द्वारकादास चिखलीकर यांच्या सूचनेवरून सपोनि पांडूरंग भारती व कर्मचारी तानाजी येळगे, मारोती तेलंग, मोतीराम पवार, गजानन बैनवाड, शेख कलीम आदींनी केली.